REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# भारतातील सेंद्रिय शेतीः आजची स्थिती

प्रा.डॉ. गवारे नानासाहेब बापुराव
सहयोगी प्राध्यापक,
जयभवानी शिक्षण संस्थेचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा जि.बीड (महाराष्ट्र)

## प्रस्तावना :



भारतीय अर्थव्यवस्था ही जगात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारताचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. भारतात आजही 55 टक्के लोक ग्रामीण भागातच राहतात. शेतीचे अनन्य साधारण महत्व आहे. शेतीवरच उदयोग क्षेत्राचे भवितव्य अवलंबून आहे. म्हणूनच पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीला प्राधान्य दिले होते. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. म्हणून हरीतक्रांतीची गरज भासली. या हरीतक्रांतीमुळे शेतीत नवीन पिकांच्या जाती, रासायनिक खते आणि किटक नाशके यांचा मोठया प्रमाणात वापर करण्यात आला. लोक संख्येची अन्नाची गरज भागविण्यासाठी हे आवश्यक होते. हरीतक्रांतीमुळे शेती उत्पादनात प्रचंड वाढ झाली. हरीतक्रांतीमुळे एकीकडे उत्पादन जरी वाढले असले तरी दुसरीकडे अतिरिक्त रासायनिक खते, किटकनाशके, पाणी यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. त्याच बरोबर मानवी आरोग्यावर वाईट परिणाम झाला. याला वेगळा पर्याय शेंद्रीय शेती हाच आहे.

हजारे वर्षापासून भारतात सेंद्रीय केली जात होती. प्राचीन साहित्यामध्ये शेंद्रीय उत्पादन घटकाचा उल्लेख आढळतो. ऋग्वेद, महाभारत व कौटिल्य अर्थशास्त्र यांचा त्यात समावेश आहे. पारंपारिक शेतीमध्ये शेंद्रिय शेतीचे तंत्र वापरले जात होते.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध निबंधामध्ये द्वितीय स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके, शेंद्रीय शेती विशेषांक, शेतीशी संबंधीत विविध संस्थाचे अहवाल, सांख्यिकीय गोषवारा यांचा समावेश आहे.

## संशोधनाची उदिश्टये :

1. शेंद्रीय शेतीचा अभ्यास करणे.
2. शेंद्रीय शेतीचे महत्व अभ्यासणे.
3. शेंद्रीय शेती संबंधी शेतकऱ्या मध्ये जागती निर्माण करणे.
4. शेंद्रीय शेती बाबतीत भारताचे जगातील स्थान अभ्यासणे.

## शेंद्रीय शेतीचे सद्यस्थिती :

आज जगात 189 देशात शेंद्रीय शेती केली जाते. 57.8 दसलक्ष हेक्टर जमिनीवर ही शेती केली जाते. 2.7 दशलक्ष शेतकरी हे उत्पादक आहेत. भारतात 30 टक्के उत्पादक आहेत. हेच प्रमाण 2.59 टक्के आहे. शेंद्रीय

शेती बाबतीत भारताचा जगात 9 वा क्रमांक लागतो. आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत भारतीय मालाला विशेषतः फळे, धान्य तसेच प्रक्रिया केलेला शेतमाल याला दिवसेंदिवस बंधने येत आहेत. रासायनिक खते, किटक नाशके, कृत्रीम संजिवकांचा असंमजस व अयोग्य वापर सध्या आपल्या देशाच्या निर्यात धोरणाच्या दृष्टिने असंख्य अडचणी आणणारा आहे. युरोपीय देशात निर्यातीचे कडक नियम आहेत. दुसरीकडे आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर उद्याच्या पिढीचे काय? असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून ही परिस्थिती जर बदलायची असेल तर शेंद्रीय किंवा निसर्ग शेती किंवा रासायनिक किटक नाशक अंशरहीत शेती हाच पर्याय आहे.

**तक्ता क. 1**

**जागतीक सेंद्रिय शेती जमीन – 2011 ते 2018**

| अ.क. | वर्ष | जमीन – दसलक्ष हेक्टर |
|---|---|---|
| 1 | 2011 | 37.25 |
| 2 | 2012 | 37.65 |
| 3 | 2013 | 43.20 |
| 4 | 2014 | 44.40 |
| 5 | 2015 | 50.92 |
| 6 | 2016 | 57.08 |

Source : The World Organic Agriculture Stastics and Emerging Treends 2017

वरील तक्त्यामध्ये जागतिक शेंद्रीय शेती जमीन याची माहिती दाखविली आहे. 2011 मध्ये 37.25 दसलक्ष्य हेक्टर जमीन होती. तर 2018 मध्ये 57.8 दसलक्ष हेक्टर पर्यंत वाढ झाली आहे. प्रत्येक वर्षी शेंद्रीय शेत जमीनीत वाढ होत आहे असे दिसून येत आहे.

**तक्ता क. 2**

**अशियातील सेंद्रिय शेतीचे प्रमाण**

| अ.क. | देश | सेंद्रिय शेती जमीन प्रमाण |
|---|---|---|
| 1 | चीन | 40 टक्के |
| 2 | भारत | 30 टक्के |
| 3 | कझाकिस्थान | 08 टक्के |
| 4 | फिलीपाईन्स | 06 टक्के |
| 5 | इंडोनेशिया | 03 टक्के |
| 6 | इतर | 13 टक्के |

Source : The World Organic Agriculture Stastics and Emerging Trends 2017

वरील तक्त्यामध्ये आशियायी देशात शेंद्रीय शेत जमीनीचे प्रमाण दर्शविलेले आहे. त्यामध्ये असे दिसून येते की, चीन मध्ये हेच प्रमाण 40 टक्के म्हणजे सर्वांत जास्त आहे. त्यानंतर भारतात 30 टक्के आहे. शेवटी इंडोनेशिया यांचा क्रम लागतो. भारताला बराच वाव आहे.

**तक्ता क. 3**

**भारतातील सेंद्रीय शेती जमीन 2011 ते 2015**

| अ.क. | वर्ष | सेंद्रिय शेत जमीन – हेक्टर हजारामध्ये |
|---|---|---|
| 1 | 2011 | 1084 |
| 2 | 2012 | 500 |
| 3 | 2013 | 510 |
| 4 | 2014 | 720 |
| 5 | 2015 | 1180 |

Source : The World Organic Agriculture Stastics and Emerging Trends 2017



LBP PUBLICATION

वरील तक्त्यामध्ये भारतातील शेंद्रीय शेत जमीन दखविलेली आहे. 2018 मध्ये 1084 हेक्टर आहे. तर 2015 मध्ये 1180 हेक्टर आहे. यावरून हे स्पष्ट होते की, भारतात सतत सेंद्रीय शेती मध्ये वाढ होत आहे.

**तक्ता क. 4**
**भारतातील सेंद्रीय शेती उत्पादक – 2011 ते 2015**

| अ.क. | वर्ष | सेंद्रिय शेत जमीन – हेक्टर हजारामध्ये |
|---|---|---|
| 1 | 2011 | 548 |
| 2 | 2012 | 600 |
| 3 | 2013 | 650 |
| 4 | 2014 | 650 |
| 5 | 2015 | 585 |

Source : The World Organic Agriculture Stastics and Emerging Trends 2017

वरील तक्त्यामध्ये भारतातील शेंद्रीय शेती उत्पादकाची संख्या दाखविली आहे. सन 2011 मध्ये 548 होती तर 2015 मध्ये त्यात वाढ होवून ती 585 झाली आहे. जगात सर्वात जास्त शेंद्रीय शेती उत्पादक भारतात आहेत.

**तक्ता क. 5**
**विविध राज्यातील क्षेत्र निहाय स्थान 2011– 2012**

| अ.क. | राज्य | क्षेत्र | स्थान |
|---|---|---|---|
| 1 | मेघालय | 0.01 | 16 |
| 2 | केरळ | 0.28 | 15 |
| 3 | सिक्कीम | 0.46 | 14 |
| 4 | तामिळनाडू | 0.69 | 13 |
| 5 | गुजरात | 0.76 | 12 |
| 6 | ओरीसा | 0.79 | 11 |
| 7 | आंध्रप्रदेश | 0.86 | 10 |
| 8 | उत्तराखंड | 2.21 | 09 |
| 9 | महाराष्ट्र | 4.42 | 06 |
| 10 | गोवा | 2.77 | 08 |
| 11 | उत्तर प्रदेश | 46.73 | 01 |
| 12 | मध्यप्रदेश | 7.79 | 03 |
| 13 | चंदीगड | 5.40 | 05 |
| 14 | हिमाचल प्रदेश | 16.82 | 02 |
| 15 | राजस्थान | 4.01 | 07 |
| 16 | इतर | 6.00 | 08 |

Source : National Project Farming annual Report 2012-2013

वरील तक्त्यामध्ये राज्यनिहाय शेंद्रीय शेतीचे क्षेत्र दाखविलेले आहे. त्यामध्ये सर्वात जास्त क्षेत्र उत्तर प्रदेश राज्याचे आहे. तर सर्वात कमी क्षेत्र मेघालय या राज्याचे आहे. भारत सरकारने सिक्कीम हे राज्य संपूर्ण शेंद्रीय शेती करणारे राज्य म्हणून जाहीर केले आहे.



LBP PUBLICATION

## सेंद्रीय शेतीचे फायदे :

1. जैवविविधता टिकते.
2. पर्यावारण संवर्धनास मदत होते.
3. जमीनीचा पोत सुधारतो.
4. उत्पादन वाढते.
5. उत्पादन खर्च कमी होतो.
6. शेतकरी आत्महत्या कमी होण्यास मदत होईल.

## शेंद्रीय भोतीच्या उपाययोजना :

1. सरकारी अनुदानामध्ये वाढ करणे.
2. शिक्षण व प्रशिक्षण सुविधा देणे.
3. शेती संशोधनावर भर देणे.
4. सक्षम राष्ट्रीय शेती धोरण आखणे.
5. पीक रचनेत बदल करणे.
6. निर्यात वाढीला चालना देणे.

## निष्कर्ष :

भारतामध्ये संेद्रीय शेतीच्या क्षेत्रात सतत वाढ होत आहे. सेंद्रीय शेती हा चिरस्थायी विकासाचा एक मार्ग आहे. जगात सर्वांत जास्त सेंद्रीय शेती उत्पादक शेतकरी भारतात आहेत. सेंद्रीय शेती बाबतीत भारताचा जगात 9 वा क्रमांक लागतो. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये सेंद्रीय उत्पादनाला मोठया प्रमाणात मागणी आहे. परंतु पर्यावरणाच्या चक्राला अबाधित ठेवून सेंद्रीय शेती करावी लागेल. आजच्या व भविष्यातील पिढीच्या आरोग्यासाठी सेंद्रीय शेतीला प्राधान्य दिले पाहिजे. सेंद्रीय पदार्थाच्या पुनर्वापरातून जमीनीची उत्पादकता टिकते. अन्नद्रव्याची होणारी घट, पावसाच्या पाण्याने होणारी जमिनीची धूप थांबते. जमिनीचे भौतिक गुणधर्म सुधारून पीक वाढीसाठी फायदा होतो. सेंद्रीय शेतीत पक्षाद्वारे कीड नियंत्रण करण्याची पध्दती प्रभावी आहे. त्यामुळे पक्षाचे संरक्षण महत्वाचे आहे. सेंद्रीय उत्पादनाचा माणसी वापर वाढला पाहिजे. तो 2012 मध्ये 9.08 डॉलर होता. आजच्या परिस्थीतीमध्ये जमीनीचे आरोग्य, वृक्ष, प्राणी, मानव यांचे संरक्षण करण्यासाठी सेंद्रीय शेती शिवाय दुसरा चांगला कोणताही पर्याय नाही.

## संदर्भसूची:


1. Federation of organic Agricultural Movement (IFOAM) 2002
2. Food and Agricultural Organization of the United Nations (FAO) 2002/2007
3. World Trade Organization (WHO) 2001.
4. World Organic Agricultural Report, 24 Feb.2018.
5. International Forum for Organic Agricultural Movement (IFOAM) 19 Feb. 2018
6. सेंद्रीय शेती विशेषांक ॲग्रोवन 25 नोव्हेंबर 2014.